IIPIMRJ
IIP
International Multidisciplinary Research Journal

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# पर्यावरणीय जाणीव व शाश्वत विकासासाठी ग्रंथालयाची भूमिका : पुस्तकापासून पर्यावरणापर्यंत

**डॉ. वैशाली आर. उगले**
ग्रंथपाल, श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी – वर्धा

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 19th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

शाश्वत विकास,
पर्यावरण संवर्धन,
हरित ग्रंथालय

**ABSTRACT**

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास हे मानवी अस्तित्वाशी निगडीत आहेत. ज्ञान, शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी यांचा संगम घडवणारी संस्था म्हणून ग्रंथालये या परिवर्तन प्रक्रियेत महत्वाची भूमिका निभावत आहेत. ग्रंथालय केवळ ज्ञानकोश न राहता समाजपरिवर्तनाचे, पर्यावरण जागृतीचे आणि शाश्वत विकासाचे प्रभावी माध्यम आहे. 'हरित ग्रंथालय' ही संकल्पना पर्यावरणपूरक रचना, उर्जेची बचत, डिजिटल संसाधनांचा वापर, आणि पर्यावरण विषयक जनजागृती यावर आधारित असून मानवी व पर्यावरणीय मूल्यांना जोडणारी आहे तर शाश्वत विकास Sustainable Development ही संकल्पना आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समतोल राखत पुढे जाण्याची प्रक्रिया आहे. आजच्या माहितीप्रधान समाजात ग्रंथालय आणि ग्रंथपाल यांची भूमिका केवळ ज्ञान वितरणापुरती मर्यादित नसून पर्यावरण संवर्धन, सामाजिक जागृती आणि जबाबदार नागरिकत्व निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे. या लेखाद्वारे शाश्वत विकासाच्या दिशेने ग्रंथालयांचे योगदान, तसेच ग्रंथपालाची भूमिका आणि जबाबदाऱ्या यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: Dec 18, 2025
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Ugle, V. R. (2025). **पर्यावरणीय जाणीव व शाश्वत विकासासाठी ग्रंथालयाची भूमिका : पुस्तकापासून पर्यावरणापर्यंत**. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ)*, **2**(IV), **pp. 900–904**

**प्रस्तावना**

आधुनिक तंत्रध्यानाच्या युगात ग्रंथालय हे ज्ञान, संस्कृती आणि प्रबोधनाचे केंद्र बनले आहे. पूर्वी ग्रंथालय म्हणजे पुस्तकांचे संकलन असे पूर्वापार समजल्या जाणाऱ्या संकल्पनेला आजच्या काळात ग्रंथालय हे समाज, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासाशी जोडले गेले आहे. पारंपरिक कागदाधारित पद्धतींपासून डिजिटल माध्यमाकडे झालेला ग्रंथालयाचा प्रवास म्हणजे *"पुस्तकांपासून पर्यावरणापर्यंत"* होणारा बदल आहे. त्यामुळे आज ग्रंथालय हे केवळ ज्ञानसाठा व देवाण घेवाणाचे माध्यम नसून पर्यावरण-जागरूकतेचे केंद्र बनले आहे. त्यामुळे ज्ञानसंवर्धन व समाजनिर्मितीमध्ये ग्रंथालयांची भूमिका महत्वाची आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या मते, शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमानकाळातील गरजा पूर्ण करतो परंतु भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर तडजोड करत नाही. संयुक्त राष्ट्रांनी ठरविलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टे (Sustainable Development Goals - SDGs) मध्ये शिक्षण, पर्यावरण संरक्षण, लिंगसमता, स्वच्छ ऊर्जा आणि जबाबदार वापर या क्षेत्रांचा समावेश आहे. या सर्वांमध्ये ग्रंथालयाची भूमिका अप्रत्यक्षपणे परंतु अत्यंत परिणामकारक आहे.

आजचा काळ पर्यावरणीय असंतुलन, संसाधनांचा तुटवडा, प्रदूषण आणि सामाजिक असमानता या गंभीर समस्यांचा सामना करत आहे. या पार्श्वभूमीवर "शाश्वत विकास" ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. ग्रंथालय हे केवळ ज्ञान साठवण्याचे केंद्र नसून ते सामाजिक बदलाचे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे ग्रंथालयाच्या माध्यमातून विद्यार्थी व समाज या दोन्ही स्तरांवर शाश्वत मूल्यांची रुजवणूक केली जाऊ शकते.

**शाश्वत विकासाची संकल्पना :**

शाश्वत विकास ही संकल्पना वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना येणाऱ्या पिढ्यांच्या गरजांवर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये, यावर भर देते. ही संकल्पना पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक शाश्वतता आणि सामाजिक शाश्वतता या तीन स्तंभांवर आधारलेली आहे. या तिन्ही घटकांना समतोल राखून चालणाऱ्या संस्था समाजाला सुरक्षित, सुजाण आणि प्रगत बनवतात. ग्रंथालये ही एक संस्था आहे, जी थेट किंवा अप्रत्यक्षपणे शाश्वत विकासाला सतत गती देते.

**पर्यावरणीय शाश्वतता :**

पर्यावरणीय शाश्वतता म्हणजे नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, पर्यावरणाचे संरक्षण आणि नागरिकांमध्ये पर्यावरण-जागरूकता वाढविण्याची प्रक्रिया आहे. ग्रंथालयांमध्ये पर्यावरणाविषयी अनेक पुस्तके, जर्नल्स, अहवाल, ई-संसाधने उपलब्ध असतात. ज्यामुळे वाचकांना पर्यावरणाशी संबंधित माहिती सहज मिळते. आज अनेक ग्रंथालये "ग्रीन लायब्ररी" संकल्पनेखाली ऊर्जा-बचतीची साधने वापरणे, कागदाचा कमी वापर, ई-रिसोर्सेसचा वापर वाढविणे, वृक्षारोपण किंवा पर्यावरणविषयक उपक्रम आयोजित करतात. अशा उपक्रमांमुळे पर्यावरण साक्षरता वाढते.

**आर्थिक शाश्वतता :**

आर्थिक शाश्वतता म्हणजे उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम आणि विवेकी वापर करणे होय. ग्रंथालये विविध प्रकारच्या माहिती साधनांचा सामायिक वापर उपलब्ध करून देतात. वाचकांना पुस्तके, जर्नल्स, डेटाबेसेस खरेदी न करता मोफत किंवा अल्प

शुल्कात उपलब्ध करून देतात. यामुळे आर्थिक भार कमी होतो आणि ज्ञान-साधनांचा अधिकाधिक उपयोग होतो. ग्रंथालयातील ई-रिसोर्सेस, रेफरन्स सेवा, करिअर गाईडन्स सेवा किंवा डिजिटल लिटरेसी कार्यशाळा या सर्व सेवा व्यक्तीच्या आर्थिक प्रगतीस साहाय्यभूत ठरतात.

**सामाजिक शाश्वतता :**

सामाजिक शाश्वतता ही मानव विकास, समता, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक प्रगती यांना प्रोत्साहन देते. ग्रंथालये समाजात ज्ञानप्रसार, वाचनसंस्कृती, डिजिटल कौशल्ये, महिला सक्षमीकरण, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन, अपंगांसाठी सुलभ सेवा अशा विविध माध्यमातून सामाजिक समानता निर्माण करतात. सामाजिक प्रबोधन, वाचन स्पर्धा, विद्यार्थी उपक्रम, कार्यशाळा आणि जनजागरण कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रंथालये सामाजिक जिव्हाळा आणि समुदायभावना निर्माण करतात.

**शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी ग्रंथपालाचा संबंध :**

ग्रंथालयाचे कार्य केवळ माहिती चे देवाण घेवाण नसून समाजपरिवर्तन घडवणे आहे.शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी विविध उपक्रमाचे आयोजन करता येते. संयुक्त राष्ट्रसंघाने (UN) २०३० पर्यंत साध्य करावयाच्या १७ शाश्वत विकास उद्दिष्टांची (SDGs) घोषणा केली असून या उद्दिष्टांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्वच्छ ऊर्जा, लिंग समानता, पर्यावरण संरक्षण, दारिद्र्य निर्मूलन, आणि जबाबदार वापर यांचा समावेश आहे. या प्रत्येक उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी माहिती, जनजागृती आणि शिक्षण आवश्यक आहे आणि ही तीनही क्षेत्रे ग्रंथालय आणि ग्रंथपाल यांच्या कार्याशी थेट संबंधित आहेत.

| अ.क्र. | SDG उद्दिष्ट | ग्रंथपालाचे योगदान |
|---|---|---|
| १ | गुणवत्तापूर्ण शिक्षण (SDG-4) | माहिती साक्षरता, वाचन प्रोत्साहन कार्यक्रमाचे आयोजन |
| २ | लिंग समानता (SDG-5) | महिला सक्षमीकरणावरील कार्यक्रम राबविणे |
| ३ | स्वच्छ ऊर्जा (SDG-7) | सौरऊर्जा वापर, ऊर्जा बचत उपक्रम |
| ४ | जबाबदार वापर (SDG-12) | कागद, प्लास्टिक, इलेक्ट्रॉनिक कचरा कमी करण्यासाठी प्रोत्साहित करणे |
| ५ | हवामान कृती (SDG-13) | पर्यावरण वाचन सप्ताह, हरित ग्रंथालय उपक्रम |
| ६ | भागीदारी (SDG-17) | NGO,ग्रामपंचायत, शैक्षणिक संस्था व समाजासोबत सहयोग करणे व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करणे |

**शाश्वत विकासातील ग्रंथपाल व ग्रंथालयाची भूमिका :**

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी ग्रंथालये केवळ माहिती-संचयाची केंद्रे नसून सामाजिक परिवर्तनाची प्रभावी माध्यमे बनत आहेत. ज्ञान, माहिती, संशोधन-साधने आणि पर्यावरणीय व सामाजिक जागरूकता यांचा समतोल साधून ग्रंथालये समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. खालील घटकांद्वारे ग्रंथालय व ग्रंथपाल शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांची पूर्तता प्रभावीपणे करतात.

**पर्यावरण शिक्षणाचा प्रसार**

पुस्तके, संशोधन पेपर, जर्नल्स व ई-संसाधने उपलब्ध करून पर्यावरणाशी संबंधित ज्ञान ग्रंथालये पर्यावरणीय साक्षरता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

- पर्यावरणविषयक सर्वांसाठी सहज उपलब्ध करून देतात.
- व्याख्याने, प्रदर्शन, वाचन सप्ताह, पर्यावरण-जागरूकता मोहिमा यांच्या माध्यमातून विद्यार्थी व नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक विचारसरणी रुजवली जाते.

**ई-संसाधनांचा वापर : ऊर्जा कार्यक्षमता आणि पेपर बचत**

डिजिटल युगात ग्रंथालयांनी ई-संसाधनांना प्राधान्य देणे ही शाश्वततेसाठी आवश्यक बाब आहे.

- ई-पुस्तके, ई-जर्नल्स, डेटाबेसेस यांचा व्यापक वापर करून कागदाचा वापर कमी केला जातो.
- माहितीची त्वरित उपलब्धता, संशोधनातील गती, आणि माहितीच्या प्रवेशातील समता वाढते.
- पेपरलेस संस्कृतीला प्रोत्साहन मिळून ऊर्जा वापर, साठवण खर्च आणि कचरा निर्मिती कमी होते.

**पर्यावरणाशी संबंधित साहित्याचा संग्रह व प्रसार**

शाश्वत विकासाशी संबंधित विषयांना प्राधान्य देणारी माहिती प्रणाली निर्माण करणे हे ग्रंथालयाचे एक महत्त्वाचे उत्तरदायित्व आहे.

- हवामान बदल, जलसंवर्धन, प्रदूषण, जैवविविधता, अक्षय ऊर्जा, शाश्वत विकास यांसारख्या विषयांवरील पुस्तके, अहवाल, संशोधन साहित्य व डिजिटल सामग्रीचा व्यापक संग्रह तयार केला जातो.
- विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि नागरिकांना या महत्त्वपूर्ण माहितीचा सुलभ व विश्वासार्ह प्रवेश मिळतो.

**समुदाय सहभाग आणि जनजागृती उपक्रम**

शाश्वत वर्तनाची सवय समाजात रुजवण्यासाठी समुदाय सहभाग आवश्यक आहे.

- ग्रंथालये हरित जनजागृती कार्यक्रम, पोस्टर प्रदर्शन, शैक्षणिक चित्रफिती, कार्यशाळा, परिसंवाद यांच्या आयोजनातून पर्यावरण समस्यांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करतात.
- विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सहभागी करून त्यांच्यात जबाबदार नागरी मूल्यांची रुजवणूक केली जाते.

**ग्रीन लायब्ररी (हरित ग्रंथालय) संकल्पनेचा प्रसार**

ग्रीन लायब्ररी ही संकल्पना ग्रंथालयांना पर्यावरणपूरक आणि टिकाऊ बनविण्याचा प्रयत्न आहे.

- ऊर्जा कार्यक्षम LED दिवे, सौरऊर्जा प्रणाली, नैसर्गिक प्रकाशाचा वापर यांसारख्या उपायांनी ऊर्जा बचतीला चालना दिली जाते.
- कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकविरहित परिसर, ई-वेस्टचे योग्य निपटारा, पावसाचे पाणी साठवण इत्यादी उपक्रम राबविले जातात.
- पर्यावरणपूरक साहित्य, पुनर्वापरयोग्य साधने आणि रिसायकलिंग प्रक्रियांचा अवलंब करून ग्रंथालय टिकाऊ पायाभूत सुविधा विकसित करते.

**निष्कर्ष (Conclusion)**

पर्यावरणीय जाणीव आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने ग्रंथालयांची भूमिका आज अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. ग्रंथालय हे फक्त पुस्तके साठवण्याचे ठिकाण नसून, पर्यावरणपूरक विचारसरणी घडविणारे, शाश्वत मूल्यांचे संवर्धन करणारे आणि समाजपरिवर्तन घडविणारे प्रभावी केंद्र बनले आहे. डिजिटल संसाधनांचा वाढता वापर, ऊर्जा-बचतीचे उपाय, हरित उपक्रम, पर्यावरण शिक्षण आणि समुदाय सहभाग यांच्या माध्यमातून ग्रंथालये पर्यावरण संरक्षणाच्या प्रक्रियेत थेट योगदान देतात.

ग्रंथपाल हा माहितीचा रक्षक नसून समाजाचे दिशादर्शक आहे. SDGsच्या पूर्ततेसाठी आवश्यक असलेली शिक्षण, जागृती, जबाबदार वापर संस्कृती आणि पर्यावरणपूरक वर्तन यांची रुजवणूक ग्रंथालयाच्या माध्यमातून प्रभावीपणे करता येते. "पुस्तकापासून पर्यावरणापर्यंत" झालेला ग्रंथालयाचा प्रवास म्हणजे ज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण आणि समाज या चार घटकांचा एकत्रित, संतुलित आणि सकारात्मक विकास.

शेवटी, शाश्वत भविष्य घडविण्यात ग्रंथालयांची भूमिका पूरक नव्हे तर केंद्रस्थानी आहे. हरित ग्रंथालय संकल्पना आणि पर्यावरण-जागरूक ग्रंथपाल यांच्या एकत्रित प्रयत्नांतून शैक्षणिक संस्था आणि समाज या दोन्ही स्तरांवर टिकाऊ, सुजाण आणि पर्यावरणपूरक संस्कृती निर्माण होऊ शकते. ग्रंथालयातून हरित विचारांच्या दिशेने होणारा प्रत्येक छोटा बदल, समाजाला अधिक सुरक्षित, संवेदनशील आणि शाश्वत भविष्याकडे नेणारा मोठा पाऊल ठरतो.

ग्रंथालयातून शाश्वततेकडे हा प्रवास म्हणजे वाचन , विचार , कृती व परिवर्तन या चार टप्प्यांतून समाजात हरित संस्कार रुजविणे आहे.

**शिफारसी :**

- ई-संसाधनांचा वापर प्रोत्साहित करावा.
- पर्यावरण संवर्धनाशी संबंधित कार्यक्रमांचे वार्षिक नियोजन करावे.
- विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार वापर संस्कृती रुजवावी.
- स्थानिक पर्यावरण संघटनांशी सहयोग साधूनकार्यक्रमाचे नियोजन करावे.
- प्रत्येक महाविद्यालयात "ग्रीन लायब्ररी क्लब" स्थापन करावा.
- ग्रंथालयात ऊर्जा बचतीसाठी LED व सौरऊर्जा वापरावी.

**संदर्भ :**

1. Biswas, A. (2021). Role of Green Information Communication Technology to Transform Library as Green Library: a Study in The Context of Academic Library. *Influences of Green Technology in Academic Libraries*, *March*, 195–214.
2. https://www.researchgate.net/publication/350018416_Role_of_Green_Information_Communication_Technology_to_Transform_Library_as_Green_Library_A_Study_in_the_Context_of_Academic_Library
3. Das, R. K. (2023). *The Green Blueprint : Strategies For Building And Operating Sustainable Academic Libraries With Special References To The University Libraries Of Assam. December.* https://doi.org/10.1729/Journal.37179
4. https://www.ifla.org/the-ifla-guidelines-for-green-and-sustainable-libraries/
5. Lal, J. (2018). The Green Library: An Initiative to Sustainable Library. *Pearl : A Journal of Library and Information Science*, *12*(1), 28. https://doi.org/10.5958/0975-6922.2018.00004.9
6. Pagore Ranjeet , Chalukya,B.V.(2022). Green Library. IP Indian Journal of Library Science and Information Technology. 7(1):36-39, 2022. | https://doi.org/10.18231/j.ijlsit.2022.007